| MHBI120010592015 | **नियमित दिवाणी दावा क. १६९/२०१५ मधील निशाणी क्रमांक १० वर आदेश** |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी सदरचा दावा त्यांचे विरूद्ध एकतर्फा चालविण्याचा झालेला दिनांक १५.०१.२०१८ रोजी झालेला आदेश रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** उपरोक्त प्रतिवादी यांनी असे नमुद केले आहे की, प्रतिवादी यांना सदर प्रकरणाची नोटीस न मिळाल्याने सदर प्रकरणाविषयी त्यांना माहीती नव्हती. त्यानंतर प्रतिवादी यांनी ऑनलाईन पाहिल्यानंतर प्रतिवादी यांच्या नावे प्रकरण प्रलंबीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे प्रतिवादी यांनी सदरचा दावा त्यांचे विरूद्ध एकतर्फा चालवण्याचा झालेला आदेश रद्द करून मिळण्याची विनंती प्रतिवादी यांनी केली.

**३.** अर्जास वादी यांनी म्हणणे दाखल करून प्रतिवादी यांना दिनांक ०७. ०४.२०१६ रोजी समन्सची बजावणी झालेली आहे. प्रतिवादी हे सदर प्रकरणात जाणीवपूर्वक हजर रहात नाही. त्यामुळे सदर अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**४.** अर्ज व त्यावरील वादीच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

**५.** प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की, प्रतिवादी यांना दिनांक ०७.०४.२०१६ रोजी सदर प्रकरणामध्ये समन्स प्राप्त होवूनही प्रतिवादी सदर प्रकरणात हजर झाले नाहीत. प्रतिवादी यांचे विरूदध दावा एकतर्फा चालविण्याचा

आदेश दिनांक १५.०१.२०१८ रोजी पारीत करण्यात आला आहे. सदर आदेश रद्द करण्यासाठी प्रतिवादी यांनी दिनांक ०५.११.२०१९ रोजी अर्ज दाखल केला असुन सदर अर्जामध्ये एकतर्फा आदेश रदद होवून लेखी म्हणणे रेकॉर्डवर घेवून झालेला विंलब माफ करावा अशी विनंती केली आहे. परंतु प्रतिवादी यांना समन्सची बजावणी होवून देखील ते न्यायालयात मुदतीत हजर न झाल्याने प्रस्तुत दाव्याच्या कामकाजात बराचसा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांनी दाव्यात वेळेत हजर न झाल्याचे कारण त्यांना समन्स मिळाले नसल्याचे नमुद केले आहे. परंतु दिनांक १४.०६.२०१७ रोजी त्यांची पत्नी रत्नमाला यांनी त्यांच्या पतीच्या वतीने समन्स स्विकारल्याचे दिसुन येत आहे. प्रस्तुतचा दावा हा रक्कम वसुल करण्यासाठी दाखल केला असुन सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी प्रतिवादी यांना दाव्यात हजर होवू देण्याची संधी देणे न्यायोचित ठरते. परंतु प्रतिवादी यांनी अर्जामध्ये दिलेले विलंबाचे कारण व दाव्याचे कामकाजात झालेला उशीर लक्षात घ ोता दावा चालण्यास प्रतिवादी यांच्यामुळे झालेल्या उशीराची भरपाई प्रतिवादीवर खर्चाचा अंमल करून घेता येवू शकते.

**६.** प्रस्तुत अर्जामध्ये उशीर माफ होवून प्रतिवादी यांचे म्हणणे रेकॉर्डवर घेण्यासाठी प्रतिवादी यांनी सदर अर्जासोबत त्यांचे म्हणणे व त्याचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादी यांनी केवळ त्यांचे म्हणणे अभिलेखावर दाखल केले असुन त्याचे पुष्ठर्थ प्रतिज्ञापत्र अभिलेखावर आढळुन येत नाही. दिवाणी प्रक्रिया संहिताचा आदेश ६ नियम १५ (४) अन्वये वादी व प्रतिवादी यांनी आपल्या म्हणण्यासोबत प्रतिज्ञापत्र दाखल करणे आवश्यक आहे. परंतु प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणेय दाखल केले आहे, त्याच्यासोबत प्रतिज्ञापत्र दाखल न केल्याने सदरचे म्हणणे अभिलेखावर घेता येणार नाही. सबब, प्रतिवादी यांची त्यांचे लेखी म्हणणे अभिलेखावर घेण्याची विनंती मान्य करता येणार नाही.

**७.** नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने प्रतिवादी यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देण्यसाठी त्यांच्याविरूध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करणे

आवश्यक आहे. परंतु त्यामुळे झालेला उशीराची भरपाई ही खर्चाच्या स्वरूपात वादीस भरून देणे आवश्यक आहे. यास्तव मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे :

## <u>आदेश</u>

**१)** सदरचा अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रू. १०००/— एवढा खर्च दिल्यानंतर त्यांचे विरूद्ध झालेला दावा एकतर्फा चालवण्याचा आदेश रद्द करण्यात येवून त्यांचा लेखी जवाब अभिलेखावर घेण्यात यावा. प्रतिवादी यांनी सदर खर्चाची रक्कम न चुकता पुढील तारखेस अथवा त्यापुर्वी वादी यांना अदा करावी.

Digitally signed by NUTAN SACHIN KADAM
Date: 2022.08.02 17:03:43 +0530

दि. २६.०७.२०२२
स्थळ: धारूर

(एन.एस.कदम)
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
धारूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द—नि—शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | २६.०७.२०२२ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २६.०७.२०२२ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | २६.०७.२०२२ |

**सही/—**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड—३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर